# ‘अपयशाने निराश होऊ नका’

लेण्याद्री/प्रतिनिधी

शाळेत विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडविले जात असले तरी विद्यार्थी ज्या वातावरणात राहतो, त्याचेही संस्कार त्याच्यावर होत असतात. अपयशाची निराशा पदरी येऊनही जो पुन्हा जोमाने उभा राहतो, तोच आयुष्याच्या परीक्षेत यशस्वी होतो, असे प्रतिपादन



विजयानंद कुऱ्हाडे यांनी केले.

जुन्नर एज्युकेशन सोसायटी संचालित शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप व शुभेच्छा समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष चंद्रशेखर जोशी होते.

कुऱ्हाडे म्हणाले, लहानपणी आपण जी शिक्षणासाठी धडपड करीत असतो, तीच धडपड आपला उज्ज्वल भविष्यकाळ घडविण्यासाठी कारणीभूत ठरते. शालेय शिक्षणामधूनच विद्यार्थी घडतो असे नाही, तर निसर्गामधील विविध गोष्टींमधून आपल्याला खूप काही शिकता येते. अपयश ही यशाची पहिली पायरी असते.

प्रास्ताविकात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अंजली कचरे म्हणाल्या, जेव्हा एखादा विद्यार्थी असामान्य यश मिळवितो तेव्हा सारी शाळा आनंदित होते. अशा विद्यार्थ्यांच्या यशातूनच शाळा मोठी होत असते. म्हणूनच शाळा ही विद्यार्थ्यांची दुसरी माता आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणी व शिक्षकांविषयी ऋण व्यक्त केले. ज्येष्ठ शिक्षक विकास बेल्हेकर यांनी कॉपीमुक्त परीक्षा देण्याचे आवाहन केले.

या वेळी संस्थेचे कार्याध्यक्ष दिलीप ढमढेरे, सचिव विजय ताथेड, उपाध्यक्ष संजय बुट्टे पाटील, संचालक रमेश खत्री, धनेश संचेती, उदय पुंडे, सुधीर ढोबळे, सुहास भगत, संजय मुथा, डॉ. प्रमिला जुन्नरकर, शरद गुरव, उपमुख्याध्यापक सुधीर मुथा, शिक्षकेतर प्रतिनिधी सुनील बेल्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल उंडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षक विलास पानसरे यांनी केला. तर संजय जोशी यांनी आभार मानले.

# ‘शंकरराव बुट्टे पाटील यांचे कार्य आदर्शवत’

**लेण्याद्री/प्रतिनिधी**

शंकरराव बुट्टे पाटलांनी शिक्षणाच्या माध्यमातून माणूस घडविण्याचे खूप मोठे कार्य केले. त्यासाठी त्यांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला. त्यांनी खडतर प्रयत्नातून शिक्षणाच्या माध्यमातून नव्या पिढीमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम केले आहे. त्यांचे हे काम आदर्शवत आणि प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.



शंकरराव बुट्टे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना माजी आमदार दिलीप ढमढेरे व अन्य मान्यवर.

जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षण संकुलात शंकरराव बुट्टे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले; त्या वेळी आयोजित सभेत देवेंद्र बुट्टे पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष चंद्रशेखर जोशी (गाजरे) होते. यां वेळी जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष माजी आमदार दिलीप ढमढेरे, अध्यक्ष चंद्रशेखर जोशी (गाजरे), उपाध्यक्ष संजय बुट्टे पाटील, संचालक सुधीर ढोबळे, शरद गुरव, प्रमिला जुन्नरकर, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र बुट्टे पाटील, अण्णासाहेब बुट्टे पाटील, शरद बुट्टे पाटील, प्रतीक बुट्टे पाटील, घनश्याम बुट्टे पाटील, उपमुख्याध्यापक सुधीर मुथा, संजय जोशी, शिक्षक प्रतिनिधी विकास बेल्हेकर, दिलीप देंव्हरकर, राजेंद्र फुलपगार आदी मान्यवर उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय साईनाथ ढोले यांनी करून दिला. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले, शंकरराव बुट्टे पाटलांनी बहुजन समाजाबरोबर वंचित व उपेक्षित वर्गापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवली. त्यामुळे वंचितांचे अन्यायाविरुद्ध लढण्याचे विचार प्रगल्भ झाले आणि त्यांना खऱ्या अर्थाने माणूसपण लाभले. ज्येष्ठ शिक्षक अनिल उंडे यांनी शंकरराव बुट्टे पाटलांनी शिक्षण प्रसारासंठी केलेल्या त्यागाचा व कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. सूत्रसंचालन एम. एस. पिसे यांनी केले. एस. बी. साबळे यांनी आभार मानले.